(१)

## - पर्यटन - प्रवास -

प्रवास — आपण जन्माला आल्यापासून जीवन प्रवास सुरुच असतो. पण प्रवास म्हणण्यापेक्षा जगणंच म्हणायला हवं. जगताना रोजचे कार्यक्रम नियमित पणे चालूच असतात. पण प्रत्येकाला थोडा बदल हवा असतो. म्हणून लोक पर्यटनाला जातात. जेणेकरून थोड्याशा बदलाने मनाला आनंद होतो.

पर्यटन म्हणजे वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देणे. तिथला निसर्ग हवा पाणी याचा आनंद लुटणे. कधीतरी जुनी शिल्प, अजिंठा वेरूळ सारखी लेणी पाहायला मिळतात. जुने गड किल्ले, मंदिर त्यांचं कोरीव काम खूप कांही पाहायला मिळतं. जितकं निसर्गाच्या सान्निध्यात जावं तितकं मन उल्हसित होतं. जगण्याची रंगत न्यारी असं वाटायला लागतं.

पूर्वी पासून मनुष्य ठिकठिकाणी फिरतो आहे. अगदी आदि मानव सुध्दा भटक्याच होता. पूर्वी प्रवासाच्या कांही सोयी नव्हत्या. पायीच फिरणे होते.
आता प्रवासाच्या खूप सोयी सुविधा झाल्या आहेत. वाहनांची रेलचेल आहे त्यामुळे जगभर आजचा माणूस फिरतो.

फार पूर्वीच्या गोष्टी कशाला अगदी इंग्रजांच्या राज्यांत सुध्दा लोक पायी फिरायला जात असत. माझ्या आठवणीत आहे.

लहान पणा पासून "प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा" हेच घोकलं पण पुढील आयुष्यात बदली निमित्ताने U.P. आणि M.P. त १४ वर्ष व्यतीत झाली. सासर, माहेर दोन्ही घर महाराष्ट्रात असल्याने येत होतोच. पण त्यावेळी केलेला प्रवास आणि आताचा प्रवास यात खूपच तफावत आहे. ६०-६५ वर्षापूर्वी एकंदरीत ट्रेन्स कमीच होत्या त्यात कनेक्टींग ट्रेन असणं आणि मिळणं दुरापास्तच होतं. तो प्रवासाचे अनुभव विलक्षणच होते. त्यावेळी Reservation-sleeper

classmate
Date
Page

2)

coach वगैरे कांही नव्हत. वेळेवर स्टेशनवर जायचं हमाल करायचा त्याला चार पैसे जास्त देऊन जागा मिळवून द्यायला सांगायचं. हमाल बरोबर जागा पकडायचे. मग गर्दीत्च गाडीत शिरायचं प्रवाशांची जागेसाठी भांडणं वगैरे वगैरे त्यात बरोबर लहान मुलं असली तर आणखीनच गंमत. माझ्या आठवणीत मी लहान मुलीला घेऊन १९६३ साली पहिला नागपूर ते बनारस प्रवास केला होता. नागपूर ते बनारस via जबलपूर without Reservation. म्हणजे प्रथम नागपूर - जबलपूर बसचा प्रवास. मग पुढे train. तेव्हां बसेस पण most - ordinary होत्या. मुंबईहून थेट बनारसला जाणारी "काशी एक्सप्रेस" ही एकच गाडी होती. तेव्हां तिला पुरभैय्यांची गाडीच म्हणत असत.

माझ्या आठवणीप्रमाणे three tyre sleeper वगैरे साधारण त्याच सुमारास एकाद वर्षांत सुरु झाले. तत्पूर्वी 1st class, 2nd class, असे class असायचे. सामान्य माणूस 3rd class नेच जात असे. sleeper सुविधा सुरु झाली ती सुध्दा प्रथम कांही long run च्या गाड्यांना सुरु झाली. आमच्या काशी एक्सप्रेसला सुविधा होती Reservation मात्र कांही Junctions वरुनच मिळत असे. म्हणजे मुंबईला गेल्यावर V.T. ला जाऊनच आपल्या seats किंवा berths occupy करावे लागायचे दादरहून बसले तर आम्ही हजर नाही म्हणून दुसऱ्या प्रवाशांना allot केले जायचे. अशा खूप कांही गमती असायच्या. गाडीचा schedule time 32-30 तास पण सात वर्षांच्या वास्तव्यात अनेकदा प्रवास झाला पण गाडीला ३६ते ४० तास लागायचे. कारण सारखं chain pulling. अलाहाबाद ते बनारस २॥-३ तासाच्या ठिकाणी ५ते ६ तास लागत. सगळंच खूप त्रासदायक होत. येवढ्या लांब पल्ल्याच्या गाडीत खानपान व्यवस्था नसायचीच. कित्येकदा स्टेशनवर पाणी सुध्दा मिळत नसे.

classmate
Date
Page

(3)

तेव्हा भारत स्वतंत्र होऊन जेमतेम २०-२५ वर्षे झाली होती. १५० वर्षे पारतंत्र्यात आणि परचक्राच्या अन्यायात पिचलेला देश सुधारणा करू पाहात होता. पण इंग्रजांनी फोडा आणि तोडा हे बाळकडू देऊन भारतीयांची बुध्दी भ्रष्ट केली होती. त्यामुळे जातिद्वेष धर्मद्वेष फोफावले होते. आजही आहेतच पण आता लोकांना सुधारणा, ज्ञान, विज्ञानाची किंमत कळली आहे. आज भारत सर्व दृष्टीने आघाडीवर आहे. अग्रेसर होऊ पाहात आहे. ही गोष्ट निर्विवाद आहे.

आता मेट्रो, वंदे भारत, राजधानी सारख्या आलिशान गाड्या धावत आहेत. पूर्वी विमान सेवा पण नगण्य होती. आता तसे नाही.

Technology मुळे जग खूप जवळ आले आहे. नित्य नवीन शोध लागताहेत. विज्ञानाचा उपयोग सुख आणि प्रगतिसाठी होतो. अर्थातच या सर्व सोयी सुविधांमुळे आजकाल जगभर पर्यटन खूप वाढले आहे. आपोआपच वेगवेगळ्या संस्कृतींचे आदानप्रदान होते.

मोबाईल मुळे सोय झाली. कितीही लांबच्या देशात किंवा खंडात असलेल्या आपल्या लोकांशी किंवा कोणत्याही कोपऱ्यात आपण संपर्क साधू शकतो. फार काय अवकाशयानातील लोकांशी शास्त्रज्ञ पृथ्वीवरून संपर्क साधतात लांबच्या लोकांना आपण पाहू शकतो.

समाजात काही विध्वंसक वृत्तीचे लोक असतातच जे विज्ञानाचा उपयोग कुकर्म करण्यासाठी करतात. त्यामुळे सायबर गुन्ह्यांसारखे गुन्हे होताहेत.

समाजकंटक आहेत तोपर्यंत विज्ञानाचा निखळ उपयोग होऊ शकत नाही.

तरीही लोकांनी पर्यटन करावं निसर्गाच्या जवळ जावं निसर्गच मानव जातीचा प्रथम गुरू आहे. त्यात खूप ज्ञान, विज्ञान, आनंद भरलेला आहे.

– चला तर मग पर्यटनाला –

आशा पावगी.
"आनंदवन", B-10.
वृंदावन कॉम्प्लेक्स.
कोथरूड, पुणे.

## आशा पावगी यांनी काढलेली चित्रे




